# बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन खाते

**स. अभि./ ई /९९४२/ घकव्य. दि. ०७.०८.२०२५**

विषय:- 'ई' विभागात 'गणेशोत्सव -२०२५' सणांनिमित्त गणपती मंडपाच्या आजूबाजूच्या परीसराची साफसफाई व कृत्रिम तलावाच्या आसपासची साफसफाईची कामे करुन घेण्याबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

'ई' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरिता 'गणेशोत्सव -२०२५' सणांनिमित्त गणेशोत्सव मंडपाच्या आजूबाजूच्या परीसराची साफसफाईचे व कृत्रिम तलावाच्या आसपासची साफसफाई' करण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| १. | गणेशोत्सव सणांनिमित्त गणपती मंडपाच्या आजूबाजूच्या परीसराची साफसफाईचे कामे | ०८ |
| २. | गणेशोत्सव सणांनिमित्त कृत्रिम तलावाच्या आसपासची साफसफाईचे कामे | ०२ |

अर्जाचा नमुना 'ई' विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. ३,६३० /- + ९ % राज्य सरकार + ९% क्रेंद्र सरकार (एकुण रु. ४,२८३.४०) रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगपालिका (Municipal Corporation of Greater Mumbai)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र **(C.F.C.)** येथे जमा केल्यानंतर अर्ज दि. ०७.०८.२०२५ ते दि. १३.०८.२०२५ सकाळी. १०.३० ते संध्याकाळी . ०४.०० (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक ई विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप योजनेच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येईल. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथ पत्राच्या नमुन्यासाठी 'ई' घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात, म्हाडा संकुल, घोडपदेव, ३ रा. मजला, येथे संपर्क साधावा. संस्थंने 'ई' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.१४.०८.२०२५ दुपारी. ०१.०० वाजेपर्यंत आहे. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**(०७.०८.२०२५)**

**सहा. अभि. (घकव्य), ई विभाग**